२४. कापणी

- ऐका. म्हणा. वाचा.

आता लागे मार्गेसर,
आली कापनी कापनी.
आज करे खालेवऱ्हे,
डाव्या डोयाची पापनी!

पडे जमीनीले तढे,
आली कापनी कापनी.
तशी माझ्या डोयापुढे,
उभी दान्याची मापनी.

शेत पिवये धम्मक,
आली कापनी कापनी.
आता धरा रे हिंमत,
इय्ये ठेवा पाजवुनी.

पीक पिवये पिवये,
आली कापनी कापनी.
हातामधी धरा इय्ये,
खाले ठेवा रे गोफनी.

काप काप माझ्या इय्या,
आली कापनी कापनी.
थाप लागली पिकाची
आली डोयाले झापनी!

आली पुढे रगडनी,
आता कापनी कापनी.
खये करा रे तय्यार,
हाती घीसन चोपनी.

– बहिणाबाई चौधरी

शब्दार्थ : **लागे** – सुरुवात होत आहे. **मार्गेसर** – मार्गशीर्ष महिना. **खालेवऱ्हे** – खालीवर. **डोयाची** – डोळ्याची. **जमीनीले** – जमिनीला. **तढे** – भेगा, फटी. **मापनी** – मोजणी. **पिवये** – पिवळे. **इय्ये** – विळे (ज्वारीची धाटे, गवत कापण्याचे हत्यार.) **पाजवुनी** – धार लावून. (विळ्याची कापण्याची बाजू तीक्ष्ण करणे.) **गोफनी** – गोफण, दगड फेकण्याचे साधन. **पिकाची थाप लागणे** – पिकाचा ढीग लागणे. **डोयाला झापनी येणे** – दमल्यामुळे खूप झोप येणे, श्रमाने डोळे मिटायला लागणे. **खये** – खळे. (कणसातून दाणे बाहेर काढण्यासाठी, मळणी करण्यासाठी तयार केलेली जागा.) **घीसन** – घेऊन. **चोपनी** – कणसे, जमीन बडवण्यासाठी वापरायचे जाड लाकूड.

स्वाध्याय

प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कापणी कोणत्या महिन्यात सुरू होते?

(आ) पिके कापायला आल्यानंतर कवयित्रीच्या डोळ्यांपुढे काय उभे राहते?

(इ) पिके कापणीच्या वेळी शेत कसे दिसते?

(ई) कवयित्रीने 'हिंमत धरा' असे का म्हटले आहे?

(उ) कवयित्रीने विळ्यांना धार लावून ठेवायला का सांगितले आहे?

प्र. २. खालील अर्थ असलेल्या कवितेतील ओळी शोधा व लिहा.

(अ) आता कापणीला तयार व्हा व विळ्यांना धार लावून ठेवा.

(आ) हातातली गोफण खाली ठेवा व हातात विळे घ्या.

(इ) कापलेल्या पिकाची रास लागलेली आहे.

(ई) कापणी झाल्यावर रगडणी येते.

प्र. ३. पिके कापायला आली तेव्हापासून धान्याची रास होईपर्यंत कोणकोणती कामे करावी लागतात, ते क्रमाने लिहा.

प्र. ४. तंत्रज्ञानात बदल होत असल्यामुळे शेतीच्या कामांमध्ये कसे कसे बदल होत गेले, याची माहिती मिळवा व खालीलप्रमाणे रकाने बनवून वहीत लिहा.

कामे	पूर्वीची स्थिती	सध्याची स्थिती
शेताला पाणी देणे.	बैलांच्या साह्याने विहिरीतील पाणी मोटेने उपसणे, काढणे. शेताला पाटाने पाणी देणे.	बोअरला मोटर लावून पाणी उपसणे. तुषार सिंचन, ठिबक सिंचन करणे.

प्र. ५. 'डाव्या डोळ्याची पापणी खालीवर होते' असा उल्लेख या कवितेत आलेला आहे. काहीतरी शुभ घडणार असेल, तर असे म्हणतात. अशा अनेक समजुती समाजात रूढ आहेत. तुमचे आजी–आजोबा, आई–वडील, शेजारी, आसपासचे लोक यांच्याकडून अशा समजुतींची माहिती घ्या. त्यांची कारणे शिक्षकांकडून समजून घ्या. त्या मागील वैज्ञानिक कारणे शोधा.

प्र. ६. ही कविता तुम्हांला आवडली का? या कवितेतील तुम्हांला आवडलेल्या ओळी लिहा.

प्र. ७. इया म्हणजे विळा. बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेत 'व' ऐवजी 'इ' आणि 'ळ' ऐवजी 'य' चा उपयोग करतात. कवितेत आलेले असे शब्द लिहा.

प्र. ८. खालील वाक्ये वाचा. त्यांतील समानार्थी शब्द शोधा व लिहा.

उदा., शाळेचा संघ जिंकलेला पाहून संतोषचा आनंद गगनात मावेना.

(१) पंकज आणि सरोजला कमळाचे फूल खूप आवडते.

(२) सौदामिनीने आकाशात वीज कडाडताना पाहिली.

(३) रजनी, यामिनी या निशाच्या घरी रात्री गेल्या.

(४) संग्राम आणि समर पानिपतच्या युद्धाची कथा वाचत होते.

(५) सुमन, कुमुद आणि कुसुम यांनी शाळेतील कार्यक्रमासाठी फुले गोळा केली.

(६) रवी, भास्कर, आदित्य, सविता व भानू हे सर्व मित्र दररोज सकाळी सूर्याला नमस्कार करतात.

प्र. ९. वाचा. लक्षात ठेवा.

कवितेत आलेले खालील शब्द, त्या शब्दापुढे दाखवल्याप्रमाणे नेहमी लिहितात.

कापनी - कापणी, पापनी - पापणी, मापनी - मापणी, गोफनी - गोफणी, झापनी - झापणी,

रगडनी - रगडणी, चोपनी - चोपणी.

उपक्रम : १. शेतीकामासाठी कोणकोणती अवजारे लागतात, ते शेतात जाऊन पाहा. त्यांची नावे माहीत करून घ्या. ती वापरून कोणकोणती कामे केली जातात याची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा संग्रह करा.

- **कंसांत काही क्रियापदे दिली आहेत. त्यांची योग्य रूपे तयार करून खालील वाक्यांतील रिकाम्या जागी लिहा.**

उदा., राधाने टाळ्या .... (वाजवणे)

राधाने टाळ्या वाजवल्या.

१. शिक्षकांनी मुलींचे अभिनंदन .... (करणे)

२. चंदूने झाडांना पाणी .... (घालणे)

३. आईने नीताला प्रश्न .... (विचारणे)

४. मंदा गाणी छान .... (म्हणणे)

- **कंसातील सूचनेनुसार वाक्ये बदलून पुन्हा लिहा.**

१. आकाशात ढग येताच मोर नाचू लागला.
('मोर' ऐवजी 'मुले' हा शब्द घ्या.)

२. साप दिसताच तो घाबरला.
('तो' ऐवजी 'त्या' हा शब्द घ्या.)

३. अभयने दप्तर जागेवर ठेवले.
('अभय' ऐवजी 'शारदा' हा शब्द घ्या.)